|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## वित्त (खरेदी) विभाग

जावक क्रमांक : उमवि/८/पी-०२/ १० /२०१८ दि.२९.०१.२०१९

प्रति,
मितल स्टेशनरी ॲण्ड प्रिंटर्स,
गर्व्हमेंट कॉलनी, बिल्डींग नं.बी-84 समोर,
चेतना कॉलेज मार्ग,बांद्रा (पुर्व),
मुंबई- 400 051.

**विषय :- आपल्या फर्मचे नाव पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट केल्याबाबत.**

संदर्भ :- 1) खरेदी आदेश क्र. 100003265, दि.15.10.2018
2) विद्यापीठ पत्र उमवि/8/पी 02/08/2019,दि.02.01.2019

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, विद्यापीठ खरेदी आदेश क्र.100003265 दि.15.10.2018 नुसार खरेदी आदेशातील जे साहित्य अपुर्ण होते तसेच काही साहित्य स्पेसिफिकेशन्सनुसार नसल्यामुळे परत घेऊन त्यांचा नवीन पुरवठा 08 दिवसांच्या आत करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु आपण अद्याप पावेतो सदर साहित्याचा पुरवठा केलेला नाही तसेच त्याबाबतीत आपण कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे आपणाकडून निविदेतील अटी व शर्तीचा भंग झालेला असुन विद्यापीठाच्या कामकाजात निर्माण झालेल्या अडचणींमुळे आपणावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1) खरेदी आदेश क्र.100003265, दि.15.01.2018 मधील पुरवठा न केलेले साहित्य व पुरवठा केलेले आहे परंतु जे साहित्य स्पेसिफिकेशन्सनुसार नसल्यामुळे बदलून दिलेले नाही त्या साहित्याचा खरेदी आदेश रद्द करण्यात येत आहे.
2) यापूर्वी पुरवठा केलेले आहे परंतु स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेले साहित्य (दि.13.12.2018च्या ई-मेलमध्ये कळविल्याप्रमाणे) सदरचे पत्र मिळाल्यापासून 08 दिवसांचे आत स्वखर्चाने घेऊन जाण्याची कार्यवाही करावी, अन्यथा त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
3) खरेदी आदेशापोटी भरावयाची 5% सुरक्षा अनामत रक्कम रु.6023.75चा आपण भरणा न केल्यामुळे विद्यापीठाने स्विकारलेल्या साहित्याच्या बीलाची अदायगी करताना सदरची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कमेची अदायगी आपणास करण्यात येईल.
4) सदरची कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम ही कायमस्वरुपी जप्त करण्यात येत असुन **आपल्या फर्मचे नाव विद्यापीठ पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

( सो. र. गोहिल)
**प्र-वित्त व लेखा अधिकारी**

☎ : (९१) ०२५७-(२२५७२३६, २३७.)
फॅक्स : (९१) ०२५७-(२२५८४०८)
वेबसाईट : www.nmu.ac.in
ई-मेल : pspatil@nmu.ac.in